स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २०७८.
१९४६



REFBK-0006782
REFBK-0006782

# रुपेरी रसधारा

स. अ. शुक्ल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. क्र. ८०५३
ता. १८/१२/२८

सदाशिव अनन्त शुक्ल

■

रुपेरी

# र स धा रा

[ चित्रपट-गीतांचा संग्रह ]

REFBK-0006782
REFBK-0006782

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

★ ४५ ★

मूल्य दीड रुपया

सर्वाधिकार
सुरक्षित

■

प्रथमावृत्ति
१९४६

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक
मुद्रणालय
मुंबई २

प्रकाशक
के. भि. ढवळे
श्री समर्थ-
सदन: २
चिरा बाजार
मुंबई २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रां. नं. ८०५३
ता. १८/१२/८८

सं गी त लु ब्ध
चि० सु न न्दे च्या
बा ल ली लां स

# हितगुज

गेल्या आठ वर्षांत मीं बोलपटांसाठीं लिहिलेल्यांपैकीं बहुतेक गाणीं प्रस्तुत पुस्तकांत संग्रहित केलीं आहेत. त्यांतील कांहीं, कथासंवादासह मीं लिहिलेल्या बोलपटांतील असून कांहीं दुसऱ्यांनीं लिहिलेल्या बोलपटांसाठीं मीं लिहिलेलीं आहेत. वेगवेगळ्या बोलपटांतील निरनिराळ्या प्रसंगांसाठीं हीं गाणीं रचिलीं गेलीं असल्यानें ह्यांत विषय-वैचित्र्याबरोबर रसांचीही विविधता अनायासेंच आलेली आहे.

' एखाद्या गाण्याची चाल छान असते तर एखाद्या गाण्याची शब्दयोजना समर्पक व सुंदर असते. म्हणून तें गाणें आवडीनें गुणगुणावेंसें वाटतें. पण फक्त पहिल्या एक दोन ओळीच आठवतात. सबंध गाणें तोंडपाठ नसल्यानें मोठा विरस होतो, तरी ह्या गाण्यांचा एकत्र संग्रह केल्यास संगीतप्रिय रसिकांना तें सोयीचें होईल. '... अशा अर्थाच्या सूचना बऱ्याच जणांकडून आल्यामुळें मी हीं गाणीं आज एकत्र स्वरूपांत रसिकांना सादर करीत आहें.

एरव्हींच्या पद्यलेखनापेक्षां चित्रपटांचें पद्यलेखनाचें तंत्र थोडेंसें वेगळें असतें. अनेक तांत्रिक, यांत्रिक बंधनांमुळें पद्यलेखकाच्या स्वैर कल्पकतेला साहजिकच पायबंद पडतो. चित्रपटांतील गीतें मुख्यतः बहुजनसमाजासाठीं लिहावयाचीं असल्यानें त्यांचें स्वरूप काव्यदृष्टीनें पुष्कळच निराळें असतें. रसात्मकता आणि आत्यंतिक भावनोत्कटता हीच जर काव्याची एकमेव कसोटी मानली तर रसिकांच्या अंतःकरणाला मोहिनी घालणारें काव्य चित्रपट-गीतांत निःसंशय असतें, असें म्हणण्यास प्रत्यवाय नसला तरी वाङ्मयदृष्ट्या ' काव्य ' म्हणून गणल्या जाणाऱ्या सर्वस्वी पांडित्यप्रचुर ' अभिजात ' काव्याची अपेक्षा त्या कवनांतून करण्यांत तितकासा तथ्यांश नाहीं. सर्वसामान्य श्रोत्यांच्या बुद्धीला भुलविण्यापेक्षां त्यांच्या हृदयालाच

हलविण्याचें मुख्य कार्य चित्रपट-गीतांना कर्तव्य असल्यामुळें श्रवण-मधुर स्वर-रचनेचा झगझगाट आणि मधुर कोमल लालित्यपूर्ण शब्दांचा चकचकाट ह्यांनींच तीं गाणीं बहुधा बहरलेलीं असतात. सुपरिचित सहजरम्य कल्पना, सहजगम्य भावनाच रसपरिपोषक, सोप्या शब्दांनीं सजवावी लागते ; आणि अर्थातच ती शब्दरचना निव्वळ नादमधुर नव्हे तर भावपूर्ण, अर्थवाही असावी लागते. ध्वनिमुद्रणाच्या दृष्टीनें जाडे जाडे शब्द नि जोडाक्षरेंही टाळण्याची शक्य तों खबरदारी घेणें भाग पडतें. शिवाय, वेगवेगळ्या बोलपटांतील प्रसंग-सादृश्यामुळें पुनरुक्तीचा दोष पत्करूनहि ठराविक कल्पना कांहींशा ठराविक शब्दांतच मांडण्याचा कित्येकदा प्रसंग येतो. आणि तीही वेळेच्या बंधनामुळें मोजक्या ओळींच्या मर्यादेंतच !

चित्रपट-गीतांची लोकप्रियता स्वयंसिद्ध नसून अतिशय परावलंबी असते. बऱ्याच बिकट तंत्रमंत्रांतून तिला आपला मार्ग काढावा लागतो. गाणें नुसते सुबोध, सुरस, अर्थसुंदर असून भागत नाहीं तर त्या गाण्याला रसानुकूल स्वररचनेच्या गोड सोप्या चालीप्रमाणेंच सुबुद्ध गायक-गायिकांच्या गोड गळ्याचीहि जोड लाभावी लागते. कथानकांत त्या गाण्याची प्रसंगोचित योजना व्हावी लागते. शिवाय, निर्दोष ध्वनिमुद्रण, ज्या प्रसंगासाठीं तें गाणें असेल त्या प्रसंगाचें उठावदार चित्रण आणि मुख्य म्हणजे बोलपटाचीच सर्वांगीण यशस्विता गाण्याच्या लोकप्रियतेला आवश्यक व पोषक असते.

अशी एकंदर वस्तुस्थिति असल्यामुळें प्रस्तुत संग्रहांतील गीतांच्या लोकप्रियतेचें श्रेय माझें एकट्यांचें नाहीं. त्या त्या चित्रपटांचे निर्माते, दिग्दर्शक, संगीत-दिग्दर्शक आणि नट-नटी हे त्या श्रेयाचे बहुतांशीं भागीदार आहेत, हें प्रांजलपणें आभारपूर्वक मान्य करण्यास मला आनंद वाटतो.

सदाशिव अनन्त शुक्ल

विजयादशमी, शक १८६८
श्रीसमर्थ–सदन, मुंबई ४

# गीतारम्भ—सूचि


१ अजि हा राम वनीं जाई ५
२ अजुनि येशी ना कसा ४१
३ अशि घाई कां हो सख्या ३४
४ अवतारच तूं नरवरा ! ७१
५ आत्मरंगीं प्रेमरंगीं ५१
६ आलं रंगांत लई ३३
७ उसळे जीवनसंगर घोर ४७
८ कमळकळी तूं खरी ४३
९ कलिके, खुलला बघ ४६
१० कां सुखाचें स्वप्न माझें ४८
११ किति नवलाचा डौलाचा ६१
१२ कुठवर बघशी अंत तूं तरी १७
१३ कुणीतरी सांगा हो सांगा ! ८
१४ खेळूंया नाचूंया ४५
१५ गडे, सांग ना फुलराणी ! ६३
१६ घे रामनाम मुखिं साचें ६
१७ घेइ रे नाम विठोबाचें ३०
१८ घेइल शिव अवतार भूवर ५३
१९ चला ग पुरे ना चाळा ३१
२० चिलया मोतीदाणा ५७
२१ छेडूं नको मनमोहना ! ३७
२२ जगासि रमवी मोहजालीं ४२
२३ जगिं कोण तुझ्याविण ४१
२४ जय शंकर महादेव ५५
२५ जय जय शंकर भोळा ५६
२६ जाऊं चला पण्ढरीला ९
२७ जीव आनन्दला रंगला ६०
२८ जीव शिव हे भेटले ५२
२९ झननन थय् छननन थय् ३२
३० त्यो येनार येनार येनार १५
३१ दयाळु धन्वतरी श्रीहरी ११
३२ दावि दया भगवाना ! ५६
३३ दुमदुमली हरि-गजरीं २८
३४ देइ देवपण देवाला ५२
३५ देखवेना डोळां ७०
३६ देत रविराज शुभ सन्देश ५३
३७ दे पदीं आसरा या जना २
३८ देवराया, दयाळा ! ३
३९ देवा, तूंच आम्हां आधार ४०
४० देवा, तूंची विश्वाचा २६
४१ धडाड धडाड आगीनगाडी १८
४२ धांव पाव आतां देवा ! ६५

४३ नव वसन्त-वैभव २५
४४ नवे नवे जग नाचे हांसे २१
४५ निरन्तर रामभजन १
४६ पुरे यादवी आतां ६२
४७ प्रीतिच्या अंगणीं ४४
४८ फुलली प्रीती हंसरी २०
४९ बाग फुलली हृदयाची ४८
५० बुडलें जग हलकल्लोळीं ५९
५१ मनुजा, मोहबन्धन तोड ५४
५२ मम नयनिं रामरसछाया ५
५३ माउली, येउं दे करुणा ५४
५४ माझा रामसखा वनिं आला २४
५५ माझ्या मामाच्या घरीं ४
५६ मी काशीला ग जाणार ६८
५७ मी फुलविन जादु नवी ६४
५८ या रे बाळांनो ! २२
५९ या रे, या रे, चला चला, ४४
६० येउन जा बिगि बिगी १०
६१ येइ झणीं नन्दलाल ४२
६२ रमवी मना आशा उषा ४९
६३ राजा पण्ढरीचा हरि १६
६४ रामसखा कुणि दावा ३
६५ रुसुं नको सखे कलिके ! ४५
६६ रंगरसेली नटली दुनिया ५८
६७ रंगांत रंगलं छंदांत दंगलं ७
६८ लई खट्याळ जात नारीची ३६
६९ लगबग नीज वेल्हाळा ! २९
७० लीला दावुनि नवल ५५
७१ वाहते सुखाचें वारें २३
७२ विश्वाचें हें अमुचें वैभव १३
७३ शुभ शकून सांगा कुणि बाई ६६
७४ श्रीहरि माझा ५०
७५ सखया, राया, सनिं वसन्त २
७६ सखी ही तुमची ३८
७७ सजणी, चल ये, गुंफूं हार ३९
७८ सागर खवळे गर्जत वारा ४९
७९ साजणि, माण्डुं नको ४६
८० सोड सोड ना कान्हा ! १४
८१ सोड ना धरूं नको पदर २७
८२ संकटीं या धांव सखया ! ५१
८३ सांज झाली ४३
८४ हरि वाजवि मंजुळ मुरली १२
८५ हांसून बोल ना रुसूं नको ६७

रुपेरी

# रसधारा

सन्त तुलसीदास

[ रणजित – चित्र १९३९ ]

वा. क.

तुलसीदास...विष्णुपंत पागनीस   रत्नावली...लीला चिटणीस
सरस्वती...वासंती   भोला...राम मराठे

■

[ १ ]

तुलसीदास : निरन्तर राम – भजन सुखदायी !

भवसागर हा कठीण तराया
रामनाम नौका ही !

जीवन - संजीवनी जगीं या
रामनामविण नाहीं !

■

सन्त तुलसीदास

[ २ ]

रत्ना : सखया ! राया !
मनिं वसन्त सुन्दर फुलला !

तुलसी : जीवभृंग रसरंगा भुलला

रत्ना : प्रीतीचा नव बहार खुलला

तुलसी : साजणी, तूं राधा बाळी
प्रेमळ सजला हा वनमाळी
हृदयकुंज साजरा उमलला !

रत्ना : चल नाचूंया, रास रचूंया
प्रणयमुरलीचा नाद घुमवुंया
कुंजवनीं खेळुंया कन्हैया !
मनिं वसन्त सुन्दर फुलला !

■

[ ३ ]

तुलसीदास : दे पदीं आसरा या जना
रघुवरा ! दुजी ना याचना
विश्वजीवना ! पतितपावना !
जाण रे हृदयिंच्या भावना
अन्त पाहावा किती दयाघना ?
शान्तवी जिवाच्या यातना

■

[ ४ ]

रत्ना : देवराया ! दयाळा !
ने परतीरा जीवन — नौका
बावरली बघ भोळी राधा
कृष्णसखा हसला कां ?
माजे घनान्धकार भयंकर
गरजे वादळ घोर
भेटति प्रियकर अथवा तव पद
मिटवि जिवाचा घोर

■

[ ५ ]

तुलसीदास : रामसखा कुणी दावा !
दीन अन्ध मी ; मार्ग न ठावा ;
हात दयेचा द्यावा !
राम अयोध्यावासी वदती
वृन्दावनिं तो ! कुणी बोलती
मन्दिरांत कुणि तया पाहती
गिरिकन्दरिं भेटेलच म्हणती
मनोमन्दिरीं बघुं शकेन मी
दीप असा उजळावा !
रामसखा मज दावा !

■

[ ६ ]

| | |
|---|---|
| सरस्वती : | माझ्या मामाच्या घरीं<br>मामीचें बघ राज्य रे ! |
| भोला : | घरीं बाबा आणिक मी<br>नाहिं कुणी दुसरें तिसरें ! |
| सरस्वती : | आण धाकुटी वहिनी दादा ! |
| भोला : | तुला सासरीं धाडिल ती ना ? |
| सरस्वती : | जमवुनि शेजारिणी मैत्रिणी<br>खेळत राहिल सदा अंगणीं |
| भोला : | छळील अपुल्या नणदेला<br>कुणाचेंहि भय नाहिं तिला |
| सरस्वती : | माझ्या दादाच्या घरीं<br>वहिनीचें मग राज्य रे ! |

■

[ ७ ]

तुलसीदास : अजि हा राम वनीं जाई
सवें लक्ष्मण, सीतामाई !
सकल अयोध्यावासी जनता
शोक–विकल होई !
'राम–राम' हा फोडुनि टाहो
दशरथ मृत हो पाही !
धाय मोकले सती कौसल्या
वत्साविण धेनू ही !
रामावांचुनि सुनी अयोध्या
प्राणाविण तनु राही !

■

[ ८ ]

सरस्वती : मम नयनिं राम–रस–छाया
मुखिं रामनाम–मधु–माया
ध्रुव–प्रल्हादें तुज आळवितां
धांवुनि येशी तूं भगवन्ता !
दीनवत्सला ! सदया !
पूजेचा उपचार–सोहळा,
जपतप नेणें मी घननीळा !
माझा भोळा भाव–जिव्हाळा
किति वाट बघूं रघुराया ?

■

[९]

तुलसीदास : घे रामनाम मुखिं साचें
मनुजा, जीवित दोन दिसाचें !
पाश – पसारा नश्वर सारा
मन वेडें भुललें संसारा
उडुनी जाईल जीव – पांखरूं
पुन्हां न परतायाचें !

सरस्वती : जप रामनाम तूं वाचे !
मनुजा, जीवित दोन दिसाचें !

तुलसीदास : सखे सोयरे सांथी सुखाचे
नाहीं जगतीं कुणी कुणाचे
लटकत काळ – कट्यार शिरावर
बोल फोल गर्वांचे !

भोला : वदनीं रामनाम शुभ नाचे
भय नाहिं कांहिं कलिकाळाचें
सदय सदा सुखधाम राम हा
वेड मला रामाचें !

■

[ १० ]

सरस्वती : रंगांत रंगलं ! छन्दांत दंगलं
गुंगून मन हें आनन्दलं !

गोड सोहळा बघुनी डोळां
जीवाचं भान बाई हरपलं !

पालखींत मिरवित जाई आज सन्तराणा
आनन्द कोन्दे अवघा दशदिशांत जाणा

मंगल वाद्यें गरजति सुस्वर
नाचत डोलत जन — मेळा
भक्तिजिव्हाळा नव नवलाचा
उगवे पहा भाग्य-वेळा !

■

# भक्तीचा मळा

[ राजकमल – चित्र १९४४ ]

गजरा...अमीर कर्नाटकी
सावंता...मा. कृष्णराव फुलंब्रीकर
नागू...बेबी नलिनी
गोपाळ...सामंत

■

[ ११ ]

गजरा : कुणीतरी सांगा हो सांगा!
जिवलग मिळेल कोठें?
माझा प्रभु तो मिळेल कोठें?
कुणीतरी सांगा हो सांगा!
शान्तिसुखाचा अवघा ठेवा
सखा प्रीतिचा प्राणविसांवा
जगीं कधीं आढळेल कोठें?
जिवलग मिळेल कोठें?
माझा प्रभु तो मिळेल कोठें?
कुणीतरी सांगा हो सांगा!
पळभर नाहीं चैन जिवासी
भरल्या संसारीं वनवासी
जीवन वाटे शून्यच खोटें!
जिवलग मिळेल कोठें?
माझा प्रभु तो मिळेल कोठें?
कुणीतरी सांगा हो सांगा!

चार दिसांची इथली वसती
मिसळणार मातींतच माती
पडे जिवाला कोडें मोठें
जिवलग मिळेल कोठें?
माझा प्रभु तो मिळेल कोठें?
कुणीतरी सांगा हो सांगा!

■

[ १२ ]

वारकरी : जाऊं चला पण्ढरीला
पाहूं पांडुरंग डोळां

सांवता : कां हो धुण्डितां देऊळीं?
देव हृदयाच्या राऊळीं!

वारकरी : खोटा संसार – पसारा
खेळ मायेचा हा सारा!

सांवता : नाचे विश्वाचा पसारा
मंगल विठ्ठलमय सारा!

वारकरी : नको प्रपंचाची हांव
घ्या हो देवापायीं धांव!

सांवता : करा प्रपंच नेटका
लुटा परमार्थाच्या सुखा!

■

## भक्तीचा मळा

[ राजकमल – चित्र १९४४ ]

गजरा...अमीर कर्नाटकी
सावंता...मा. कृष्णराव फुलंब्रीकर
नागू...बेबी नलिनी
गोपाळ...सामंत

■

[ ११ ]

गजरा : कुणीतरी सांगा हो सांगा !
जिवलग मिळेल कोठें ?
माझा प्रभु तो मिळेल कोठें ?
कुणीतरी सांगा हो सांगा !
शान्तिसुखाचा अवघा ठेवा
सखा प्रीतिचा प्राणविसांवा
जगीं कधीं आढळेल कोठें ?
जिवलग मिळेल कोठें ?
माझा प्रभु तो मिळेल कोठें ?
कुणीतरी सांगा हो सांगा !
पळभर नाहीं चैन जिवासी
भरल्या संसारीं वनवासी
जीवन वाटे शून्यच खोटें !
जिवलग मिळेल कोठें ?
माझा प्रभु तो मिळेल कोठें ?
कुणीतरी सांगा हो सांगा !

चार दिसांची इथली वसती
मिसळणार मातींतच माती
पडे जिवाला कोडें मोठें
जिवलग मिळेल कोठें?
माझा प्रभु तो मिळेल कोठें?
कुणीतरी सांगा हो सांगा!

■

[ १२ ]

वारकरी: जाऊं चला पण्ढरीला
पाहूं पांडुरंग डोळां

सांवता: कां हो धुण्डितां देऊळीं?
देव हृदयाच्या राऊळीं!

वारकरी: खोटा संसार – पसारा
खेळ मायेचा हा सारा!

सांवता: नाचे विश्वाचा पसारा
मंगल विठ्ठलमय सारा!

वारकरी: नको प्रपंचाची हांव
घ्या हो देवापायीं धांव!

सांवता: करा प्रपंच नेटका
लुटा परमार्थाच्या सुखा!

■

[ १३ ]

नागू : येऊन जा बिगिबिगी !
हतंच शेताच्या बान्धाला
वाट बगतीया ह्ट्टला !
सांवताची पोरगी
येऊन जा बिगिबिगी !

शेंगा, वांगीं, कणसं कवळीं
संत्रं, केळीं, पेरू, रताळीं
भक्तीची धाडली वानगी
येऊन जा बिगिबिगी !

तूं धनी आमुचा, आमी तुजं चाकुर
पर न्हाईं भेटलों कवाच आजपातुर
तुला मळ्यांत आनल्याबिगर आतां मातुर
आमी न्हाईं ऱ्हानार उगी
येऊन जा बिगिबिगी !

■

[ १४ ]

सांवता : दयाळू धन्वन्तरी !

श्रीहरी ! तूंच एकला जगान्तरीं
सृष्टि निरन्तर तुझ्या कृपेची
साक्ष पटवि अन्तरीं !

राम – रावण – संगरकालीं
लक्ष्मणाला शक्ति लागली
राघवसेवक हनुमन्तानें
उड्डाण करुनी मनोगतीनें
करतळिं झेलित औषधींचा
आणिला द्रोणागिरी

प्रभुसेवेची ती सोन्याची
सन्धि साधिली खरी !

■

[ १५ ]

गजरा :

हरी वाजवि मंजुळ मुरली
बाई ! मुरलीनें तहान – भूक हरली !

कामकाज हातचें टाकुनी
गोकुळ अवघें नाचत हरखुनि
मुरलीच कानीं मनीं भरली !

तान्हुल्यासि पाजित कुणी गवळण
मुरलीनें बावरली ती पण
तिला मुलाची शुद्धच नुरली !

राधा तर बघ वेडी झाली
सोडुनि पतिची शेज चालली !
जना मनाची लज्जा सरली !
हरी वाजवि मंजुळ मुरली !

■

[ १६ ]

सांवता : विश्वाचें हें अमुचें वैभव गाजे
आम्ही दुनियेचे राजे !

निळया नभीं रत्नांच्या तळपति ज्योति
धरणींतहि अगणित हीं माणिक-मोतीं
दाहि दिशां विश्वंभर—रूपच साजे
आम्ही दुनियेचे राजे !

धूळींतुनि सोन्याच्या राशीच उभारूं
किमया करूं !
तप अवघें कष्टांचें सन्तोषें आचरूं
आनन्दें जग भारूं सुखशान्ति वरूं !
देवाचें छत्र शिरीं नित्य विराजे
आम्ही दुनियेचे राजे !

■

[ १७ ]

गजरा : सोड सोड ना कान्हा!
मला जाऊं दे रे घरीं

गोपाळ : चल ना बघुंया साजिरी
यमुना–तीरीं मौज भारी

गजरा : कशि बाई अवखळ सारी
तुझी लीला – चातुरी !

गोपाळ : गोकुळची तूं गवळण भोळी

गजरा : भुलविशि कां रे वनमाळी?
सख्या, बोल ना मनमोहना!
परनारी मी राया!

गोपाळ : बावरशी कां वायां?

गजरा : तूं आत्मा, मी काया!

गोपाळ : मी ब्रह्मच! तूं माया!

दोघे : विश्वाची माधुरी!

■

[ १८ ]

नागू : त्यो येनार येनार येनार ग
अपुल्या मळ्यांत ग!
तुळशी–फुलांचा ताजा हार
मी घालनार त्येच्या गळ्यांत ग!
त्यो येनार अपुल्या मळ्यांत ग!

जनाई : [ अग पन कोन येनार ? ]

नागू : येनार कोन त्यें
कानांत सांगत्यें
नगं पुसूं ग येड्यावानी

जनाई : मळ्याचा धनी?

नागू : हां–हां–हां!
मळयाचा धनी येनार ग!
अपुल्या मळ्यांत ऱ्हानार ग!
त्येच्यासंगं मी खेळनार ग!
गरगर गरगर फिरनार ग!

■

[ १९ ]

सांवता : राजा पण्डरीचा हरि माझा आला !

मळा भक्तीचा फुलला
अमृतानें न्हाला
नवतेजानें खुलला
ना तुलना भाग्याला
राजा पण्ढरीचा हरि माझा आला !

मोर–मुकुट, पीताम्बर शोभे
तुळशीच्या माळा गळां
कस्तूरीचा भाळीं टिळा
वनमाळी नटला !
राजा पण्ढरीचा हरि माझा आला !

■

## गजाभाऊ

[ प्रफुल्ल–चित्र १९४४ ]

शांता...लता मंगेशकर सुमित्रा...अलका आचरेकर
बन्सी...दत्ता डावजेकर रत्नकांत...जोग
कांचनमाला...सुमति गुप्ते

[ २० ]

शान्ता : कुठवर बघशी अन्त तूं तरी
धांव सख्या गिरिधारी श्रीहरी !

येईना कशी द्रौपदीची करुणा ?
जगिं तुझ्याविना आळवूं रे कवणा ?
कोण दुजा कैवारी ? श्रीहरी !

तूंच माझा सखा प्रेमळ पाठीराखा
ऐक या हृदयाच्या हांका
संकट घोर निवारी
दुर्जन गांजिती भारी श्रीहरी !

■

[ २१ ]

सुमित्रा व बन्सी : धडाड धडाड आगीनगाडी धांवे दुनियेची
अखण्ड चाले मुशाफरी ही जीवांची !
ऐका ! ऐका ! कहाणी अमुची नवलाची
कहाणी दुर्दैवाची !

सुमित्रा : गांवाबाहिर नदीकांठावर
छानच आमुचें घरकुल सुंदर

बन्सी : शेतमळा बहरला सभोंतीं
पिकवित सोनें माणिक मोतीं

सुमित्रा : किलबिल किलबिल करिती पांखरें

बन्सी : हंबरती किती गायी-वांसरें !

दोघें : इकडे भों भों तिकडे बें बें
इकडे क्यांव् क्यांव् तिकडे म्यांव् म्यांव्
इकडे चिंव चिंव तिकडे चिंव चिंव !

बन्सी : पॅगोड्यांत दूर दूर
अथांग भक्तीचे सूर !
अखंड आबादानी सगळी
आनन्दाची रोज दिवाळी !

सुमित्रा : पण त्या दिवशीं काय झालं ?
भारिच बाई नवल वर्तलं !
आई छबीला पाजित होती
बाबा वाचित होते पोथी
खेळत होतों आम्ही चांदण्यांत

लपाछपीचा खेळ अंगणांत
तोंच अचानक घर्र घर्र
आवाज घुमला आभाळभर
आणि एकदम ठोंऽ ठोंऽऽ!

बन्सी : जिकडे तिकडे झाला गिल्ला
आला आला बॉम्बहल्ला!
विमानांची भली जंगी टोळधाड
जिकडे तिकडे धडाड धप्प्! धाड् धाड्!
एकच झाला हलकल्लोळ
अगडबंब आगीचे लोळ!

सुमित्रा : जो तो आपला धांवू लागला
दाद कुणाची नाहीं कुणाला
आई दिसेना बाळाला
बाळ दिसेना आईला
"बाळ–बाळ!"..."आई आई!"
"दादा–दादा!"..."ताई ताई!"
लाख ऐकुनी किंकाळ्या
बसल्या माझ्या कानठळ्यां
लोट धुराचे लोळ आगीचे

कुणी ऐकेना कोणाचें
मला कळेना कोठें जाऊं
ओरडलें मी "भाऊ! भाऊ!"
शोधशोधलें, दमलें, थकलें
भाऊ कोठें नाहीं दिसले
तेव्हांपासुन धुंडधुंडितें
अशीच गांवोगांव हिंडतें!

■

[ २२ ]

रत्नकान्त : फुलली प्रीती हंसरी
कशि छेडित लाडिक मञ्जुळ ललकारी!

गडे, ही पुरे अतां परी प्रीत–लकेरी!
दुमदुमती ऐक ना क्रांतीच्या या रण–भेरी!

चल, नव्या जगाचें गाणें
नव्या युगाचें गाणें
गाऊं एक दिलानें
गाऊं एक सुरानें

सांथ तुझी सुखकारी
आणील ग माधुरी नव जीवनांत न्यारी!

■

[ २३ ]

शान्ता : नवें नवें जग नाचे हांसे हें कलिके !
उमल उमल ग कोमल कलिके !
उकल आपुलें हृदय सखे !
नवें नवें जग फुले झुले बघ कौतुकें,
नाचे डोळे ! बघ ना कलिके !

दरवळत सुगंधी दुनिया
मधुमधुर मोहिनी – माया
ही माझी गोजिरवाणी
कां रुसली फुलराणी ?

गडे हांस ना, सांग ना
आपुल्या मनिंचे भाव मुके
उमल उमल ग कोमल कलिके !

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.

■

[ २४ ]

फुगेवाला : या रे बाळांनो !

चार चार पैशांत
रंगीत विमान घाला खिशांत !
आला आला बम्बईवाला !
रंगीबेरंगी फुगेवाला !
वाटोळे, लांबडे, छोटे, बडे !
हिरवे, पिवळे, निळे, तांबडे !
किती मजेदार
फुगे तऱ्हेवार !
इशाऱ्याच्या भोंग्यासाठीं
फुग्याच्यापाठीं वाजे शिटी !
चला, चला रे चला, चला !
हवाई–लढाई खेळूं चला !
बघा फुगा फुगून तट्
पटकन् फुटला फडाड् फट्ट !
एकच गिल्ला
बॉम्ब–हल्ला
सुरू झाला !
या रे बाळांनों ! या रे !
फुगे घ्या रे खेळायला !
आला आला बम्बईवाला !
रंगीबेरंगी फुगेवाला !

■

[ २५ ]

शांता : वाहतें सुखाचें वारें
दैवाचें चक्र फिरे !
हवें तेंच गवसे
तुजसि अनायासें बघ सारें

उघड उघड डोळे
व्यर्थचि होऊं नको गाफिल रे !

अन्धपणें कां फिरशी जगीं ?
हतभागी जीवा !
ना दिसे तुला तुझ्या भाग्याचा ठेवा

■

[ २६ ]

सुमित्रा : माझा रामसखा वनीं आला
छुम्छुम् छुम्छुम् छनन
झमझुम् झमझुम् झनन
या हो नाचुंया ! आनंदानें नाचुंया !
रानझऱ्यांनो ! पांखरांनो ! मंजुळ गाणीं गा !
बघा बघा तरी धनुर्धारी
माझा घननीळ आला
रामसखा वनीं आला !
तरुलतांनों ! कळ्याफुलांनों !
नाचा डोला डोला
माझा वनवासी राम आला !
भिल्लीण भोळी शबरी बघ ही
तव पदिं रामा ! तनु—मन वाही

बन्सी : बावरली परी कां अशी हृदयीं ?

सुमित्रा : व्याकुळ झालें रघुराया रे !
उष्टीं बोरें खाशिल का रे ?

बन्सी : भावभक्तीचा राम भुकेला
भावबळानें तूं वश केला !

सुमित्रा : माझा राम सखा वनीं आला !

■

[ २७ ]

काचनमाला : नव वसंत – वैभव दरवळलें !
बघ बाले, जग धालें, सोन्यानें न्हालें !
ऊठ गडे ग, लूट सुखाचें मणि – भांडार खुलें

चल ग लगबग
कां मनिं तगमग ?
साजणि बाई, कर ना घाई,
साधुनि घे ही सुवर्ण – संधि वेल्हाळे !
नव वसंत – वैभव दरवळलें !

कळ्याफुलें हीं वेंच भरारा
बहर ओसरुनि जाय झरारा
घडी अमोल न वायां दवडी
वसंत जीवानें कुठुनि हरघडी ?

हांस, नाच, बागड लडिवाळे !
स्वप्नच सुंदर नव्या जगाचें आज उमललें !
नव वसंत–वैभव दरवळलें !

■

# गोरा कुंभार

[ छाया-चित्र १९४२ ]

गोरोबा...बाबूराव महिंद्रकर　　हौशी...शकुंतला
संतूबाई...ललिता पवार　　रामी...रत्नमाला

[ २८ ]

गोरोबा :　　देवा, तूंची विश्वाचा कुम्भार !
त्राता विधाता त्रिलोकासि आधार !
　जगीं निर्मुनीयां घट जीवमात्र
　दिधलीं तुवां हीं रूपें अनन्त
चौऱ्यांशींच्या येरझारा चुकाया
तुझें नाम सोपें जपावेंच सदया !
　अणुरेणुमाजीं वससी निराकार
　पुजावें, भजावें, तुज नित्य साचार
देवा, तूंची विश्वाचा कुम्भार !

[ २९ ]

हौशी : सोड ना, धरूं नको पदर मनमोहना !
थाम्ब ना, कुणि अवचित येईल, पाहिल ना ?

घणघाई धिटाई
सख्या, भारीच बाई !
कशि वाटेंत आडविशी कान्हा !

फुले प्रीतिमळा, लागे तुझा लळा
बघ मोहरला जीव भोळा खुळा !

तुला नाहीं काळवेळ
राया, पुरे खेळ !
नको किं रे छळूं सजणा !
सोडना, धरूं नको पदर मनमोहना !

■

[ ३० ]

गोरोबा : दुमदुमली हरि–गजरीं
वैकुण्ठपेठ साजिरी
आनन्दकारी गोजिरी

वैष्णवांचा हाट थाटला
स्वर्ग नटला भूवरी
अन्तरीं सन्तत भावभक्तिची
पिकली अवघी पण्ढरी !
वैकुण्ठपेठ साजिरी !

धुन्द करी आनन्दसोहळा
छन्द गोड जीवाला
भजनरंग रंगला उसळला
‘ विठ्ठल विठ्ठल ’ घोष चालला
जीव फुलला सत्वरी !

■

[ ३१ ]

संतूबाई: लगबग नीज वेल्हाळा !
लडिवाळा बाळा !
अजुनि तुझा वाजत कां
रुणुझुणु हा वाळा ?

तान्हुल्या, सोनुल्या,
राजसा, पांखरा !
किति रे असा खेळशील ?
नीज ना वांसरा !

चन्द्र, चान्दण्या, कळ्याहि झोंपल्या,
पेंगुळली दुनिया
चिमण्या मोरा, जोजवूं किति तुला ?
लगबग नीज वेल्हाळा !

■

[ ३२ ]

गोरोबा : घेईं रे नाम विठोबाचें
मधुर निरंतरचें मनुजा !

संसाराचा फोल पसारा
मायापाश नश्वर सारा
जीव मातींतुनि जन्मा आला
अखेर मातीलाच मिळाला !
घेईं रे नाम विठोबाचें !

भक्तिबळानें जिंकुनिया जरि
प्रभुला अंकित केलें
मानव – जन्माचें तरि अवघें
सार्थक जगतीं झालें !

विठ्ठल हृदयीं वदनीं नाचे
विठ्ठल नयनीं खेळे
' विठ्ठल... विठ्ठल ' विश्व गरजलें
विठ्ठलरूपीं डोले !

[ ३३ ]

रामी : चला ग, पुरे ना, चहाटळ चाळा जगानिराळा
किति ग तुमची ही अवखळ चतुराई !
कां उगाच छळतां मजला ?

सख्या : नार केळीचा गाभा कवळा
पर दादला सुकट पाचोळा !
लई हुशार नन्दी भोळा
माकडागत सुन्दर पुतळा !
बटबटीत तिरळा डोळा
एका पायानं लंगडा कावळा !
चला बाई, करा घाई,
आणा नवरीला
गुडघ्याला बाशिंग बांधुनि
नवरा आला !

रामी : कां उगाच छळतां मजला ?

■

गोरा कुंभार

[ ३४ ]

गोरोबा : झननन थय् छननन थय्
झनन थयथया नाचे पांडुरंग !

सन्तजन – संगतिं रंगे कीर्तनरंगें
प्रेमरंगिं हा पांडुरंग ! पांडुरंग !

विठ्ठलनामाची किमया
नाचवि चलाचला माया
मंगल सुन्दर जय पांडुरंग ! पांडुरंग !

रामी : पावे, धांवे प्रभु हांकेला
भक्तिबलानें भाव – भुकेला
वश अखण्ड केला

रखुमाई : नाचे, डोले धुन्द विश्व सारें
नाचति छन्दें ब्रह्मानन्दें
चन्द्र सूर्य तारे !

■

[ ३५ ]

हौशी : आलं रंगांत लई
नव्या नवलाचं बाई !
माझ्या मोटेचं गाणं कुई कुई
सजणि ग मोटचं गाणं कुई कुई !
बागमळा फुले
शेत समदं डुले
रान सोनेरी नाचे थुई थुई ! १
मोर पियू पियू
करि कुहू कुहू
कोयळ, पोपट, मैनाहि गाई ! २
फुलाभोंतीं भुंगा
घाली पिर्ती – पिंगा;
झिंगला वाराहि लकेर घेई ! ३
पानी सुटंल खळाळ
बान्ध फुटंल...संभाळ !
मोट डौलांत वर वर येई ! ४
कसं उसाळलं !
पानी फेसाळलं
बघ मोटवन तुडुंबली ही ! ५

■

गोरा कुंभार

# सूनबाई

[ फेमस – अरुण – चित्र १९४२ ]

सुभान्या...दिनकर [ कामण्णा ]  प्रेमलता...माला

■

[ ३६ ]

ती : अशी घाई कां हो सख्या, मागें सरा
प्रेमचाळे करा, पण दुरून जरा
कुळवन्ताची कुंवार कन्या प्राणेश्वरा !
नादीं लावूं नका, छन्द नव्हे बरा ;

तो : पुरे पुरे तोरा, गोड नाजूक नखरा
प्यारी ! मीच तुझा चहानेवाला खरा

ती : साखरपुडा करा, लगीन – चुडा भरा ;
मग हक्कानं माझा हात धरा
नको प्रीतीची फुकट बढाई !

तो : राघूमैनेवाणी मी तूं राजाराणी !
लुटूं बेबन्द आनन्द प्रियकरणी !
लग्न म्हणजे ग जंगी लढाई !

ती : मैना जाईल उडून
तो : राघू झुरल मनांत !
ती : राणी बसल रुसून
तो : राजा फिरल बनांत !
ती : हवी लग्नाची बेडी !
तो : किती किती ग वेडी !
ती : थाटूं घरकुल मजेदार
तो : होईल पोरखेळ छानदार !
ती : वंशवेलीचा विस्तार होईल
तो : जीव गुन्तून व्याकुळुन जाईल !

■

[ ३७ ]

सुभान्या : लई खट्याळ जात नारीची !
तूं संभाळ मर्दा ! उडविल खुर्दा
करील मात बहरीची
भलतीच तऱ्हा प्रीतिची
नव्या नीतिची नवल रीतिची
चातुरी तिची
खट नटचंचळ बिजली अवखळ !
न्यारी बात लहरीची !
लई खट्याळ जात नारीची ! १
हटून बसंल, उगिच धुसफुसंल,
लटकंच रुसंल, खुदकन् हांसंल,
जिव्हारीं घुसंल—
जहरी गहिरी नजर दुधारी
पातच तरवारीची !
लई खट्याळ जात नारीची ! २
पर गड्या, पिर्तीची खूण
तुजी निरखून जाईल हरखून
पाहिल पारखून,
उडविल दैना माशुक मैना
इष्काच्या नगरींची !
लई खट्याळ जात नारीची ! ३

■

प्रेमलता :

छेडूं नको मनमोहना !
 ओढूं नको पदर साजणा !
लपत छपत येशी असा
 कुठुनि कसा सांग तरी
मारूं नको अंगावर
 रंगभरी पिचकारी
कान्हा ! छेडूं नको मनमोहना ! १
भान हरी जादुगिरी
 नजर तुझी ही गहिरी
लावुनि टक पाहशि मुख
 भडकत बघ आग उरीं
थांब ना ; छेडूं नको मनमोहना ! २
तनु भिजली रे थरथरते
 घागर ही शिरिं पाझरते
अवचित कुणि तरी येईल, पाहिल,
 परक्याची मी बाईल !
मजला सोड ना
 छेडूं नको मनमोहना ! ३

■

सूनबाई

# प्रेमवीर

[ हंस पिक्चर्स १९३७ ]

किशोर...मा. विनायक        कौमुदी...आशालता

■

[ ३९ ]

[ ‘शकुंतला’ – दृश्याचें पार्श्वगीत ]

सखी ही तुमची सासरीं आज निघाली !
द्या निरोप तरु – लतिकांनो !
नव सुन्दर सुम – कलिकांनो !
माया – गन्ध – विमोहिनी चाली !

तुळशी, कपिला, हरिणी
ह्या सौख्यद पावन धामीं
पाहिन नयनीं पुन्हा कधीं मी ?
मनिं दाटे तम – छाया !

मैना ! कोकिळा !
बावरी झाली
सखी ही तुमची सासरीं आज निघाली !

■

[ ४० ]

किशोर व कौमुदी :

‘ सजणी, चल ये गुंफू हार प्रणयाचा ’
‘ गुलगुल बुलबुल प्यारा बोले ’
‘ फुलला न्यारा प्रीतबहार ! ’
‘ नवलाचा चल रे सजणा, गुंफू हार ’
‘ राजसे ! फुलवरा हंसे ’
‘ दिलवरा ! दिसे प्रीतिचें गोड जडलें पिसें ’
‘ हांसत नाचत हा सरसावत वसन्त जादूगार ’
‘ बघ अलबेली दुनिया ल्याली नवतीचा शिणगार ’
‘ गुंगवि कलिका भृंगसखा हा ’
‘ रंगवि हृदय पहा ! ’
‘ जंगल मंगल सुखद विहार !
प्रणयाचा नाजुक साजुक गुंफू हार ! ’

# मराठ्याची मुलगी

[ आर्टिस्ट कम्बाइण्ड १९३९ ]

मालन...सुशीला

■

[ ४१ ]

मालन : देवा! तूंच अम्हां आधार
ठाव दिसेना, पथ गवसेना,
दाटे घनान्धकार!
कुणीं नाहीं अनाथां वाली
धर्माला ग्लानी आली
मातला कली या अवकाळीं
तुझ्या दयेची पांखर घाली
विसकटला संसार!
व्याकुळ झालीं तुझीं लेंकरें
धांव क्षणीं रे दीनदयाघन!
भाविक जीवा तुझा भरवंसा
संकटिं तारिल, ताप निवारिल,
देईल अभयच सुन्दर मंगल
नाम तुझें सुख–सार!
देवा! तूंच अतां आधार!

■

[४२]

मालन : जगिं कोण तुझ्याविण त्राता
जीव बावरला भगवन्ता !
अजि सांवरी करुणावन्ता !
दे हात दयेचा आतां
तारिलें तूंच प्रल्हादशिशूला
दाविली थोर अवतार-लीला
दिधलें जीवदान चिलयाला
तो महिमा जाय काय विलयाला ?
घे धांव झणीं प्रभुराया !
कुलदीपक हा ताराया !

■

[४३]

मालन : अजुनी येशी ना कसा रे ?
रमशी कोठें राजसा रे ?
वाट पाहूं मी किती रे ?
डोळुले शिणले बिचारे !
जग तुझ्याविण शून्य सारें
परत ये क्षणिं पांखरा रे !

■

# नारद – नारदी

[ सरस्वती – चित्र १९४१ ]

नारद...दिनकर [कामण्णा]श्रीकृष्ण...वेदपाठक नारदी...कुसुम देशपांडे

■

[ ४४ ]

श्रीकृष्ण : जगासि रमवी मोहजालीं प्रेमलीला
मोद होई प्रियकराला
कोपवाया मानिनीला
शृंगारें नटला अनुराग सखीचा
लावी चटका अधीर मनाला

■

[ ४५ ]

कृष्ण-कान्ता :

येई झणीं नन्दलाल ! देई दर्शनाला
बांसरीचा छन्द जडे, जीव धुन्द झाला
नव वसन्त आला, पसरी मोहजाला
यदुवरा, करूं या जलविहार राया !
रमवुं या जिवाला
हिन्दोला सजला नव नवलाचा
रमणी – हृदयाचा
झुलवी खुलवी मनरमणा !
शामसुन्दरासंगें हृदय रंगें प्रणयरंगें
बघ सखये, नटवर मधुवनिं लपला
हरि इथें ग ! हरि तिथें ग !
अवघा भासच हा !
शोधुनी हृदयांत पहा !

■

[ ४६ ]

सांज झाली, चान्दणी रात्र आली
चल कुंजांत लगबग नारी
फुलें वसन्त बहार सारी
मोहिनी घाली !
हंसती आकाशिं तेजाळ तारे
किति सुन्दर प्रीति—फुलोरे !
गडे, गुंफील त्यांचेच गजेर
तुझा वनमाली !

■

[ ४७ ]

नारद : कमळकळी तूं खरी सुन्दरी !
चतुर साजिरी मधुर गोजिरी
भुलला तुजला भृङ्ग तरी
नारदी : जादुगिरी ही नवनवलाची कशी ग बाई !
भोळ्या जिवाला भुलावण सारी
नारद : गुम्फूं या प्रीतीचा गोफ दुहेरी
कमळ—कळी तूं खरी सुन्दरी !
नारदी : कमळकळी मी खरी चतुर साजरी
नारद : नाचनाचरी लाजलाजरी
प्रणयसुधा उधळशी जरी
कमळकळी तूं खरी सुन्दरी !

■

नारद—नारदी

[ ५२ ]

देवयानी : कलिके, खुलला बघ भृंगसखा
भुललासे तव सहवास – सुखा

कच : भ्रमरा ! रसिका, तुज मोहवि कां
नव सुन्दर ही कलिका ?

देवयानी : गडे, तुला रुचला प्रीति – छन्द – चाळा
अलि मंजुळ गुंजारविं जीव रंजवी भोळा
आनन्द दे सुगन्ध धुन्द सुन्द मधुकराला

कच : मधुमंगल लीला गुंगवि रंगवि
अंतरंग शृंगार–शीला

देवयानी : विरहानलिं कलिका ही लोटिसी
चंचल वंचक तूं मधुपा !

कच : प्रणयाकुल नलिनी कां मानिनी
कोण्डितसे हृदयीं भ्रमरा ?

■

[ ५३ ]

कमण्डलू : साजणी ! माण्डुं नको ग लपण्डाव हा प्रीतिचा

गङ्गोत्री : बहर नवा नवतीचा !

कमण्डलू : खुलला कसा ग चन्द्र चवथीचा !

गङ्गोत्री : उधळीं हंसरी जादुगिरी
ही चन्द्रकोर राया !

कमण्डलू : पुरे पुरे तुझी माया
झुरे चकोर हा वायां ;
ओठावरल्या वारुणीचा ग
दे झणिं भरून पेला !

गङ्गोत्री : मोहक नवरसरंग, तजेला
मादक रसरसलेला !

कमण्डलू : जीव गडे, तान्हेला !
ओठावरल्या वारुणीचा ग
दे झणिं भरून पेला !

■

[ ५४ ]

कच : उसळे जीवनसंगर घोर !
व्यापितसे या हृदया वायां
तापद भारी विपदा – छाया
सजत छळाया दानव – माया
लीला दावि अघोर !

प्रळयकाळ जरी निकटीं धांवे
चिन्तातुर कां अन्तर व्हावें ?
संकटिं ज्याचें धैर्य दुणावें
तो पुरुषोत्तम थोर !

■

[ ५५ ]

देवयानी : बाग फुलली हृदयाची सख्या रे !
हांसत प्रीत – फुलवरा प्रियकरा !

माळीण मी साधीभोळी प्रेमळ बाला
भावफुलांची गुम्फिन माला
वाहिन राया ! तुजला जिवलगा !
बान्धुन ठेविन जीव जिवाला !

■

[ ५६ ]

देवयानी : कां सुखाचें स्वप्न माझें संपलें ?
अदय भासे दैव आतां कोपलें !

निखळला सौभाग्य – तारा
अन्तरीं अन्धार सारा
मरणही लाभे न ! कोठें लोपलें ?

■

[ ५७ ]

देवयानी : सागर खवळे, गर्जत वारा
वादळ उसळे, दूर किनारा !

भंगुनि डोलत डगमग नौका
नाहिं मुळींहि सीमा अन्धारा !

कुणी न सांथी, कुठें न थारा
शून्य जगीं नच जीव – निवारा !

■

[ ५८ ]

कच : रमवी मना आशा उषा सदा हांसरी
घुमवीत प्रीतीची चलाचलीं बांसरी !

जादु मधुर प्रणयाची मोहिनी
गुंगवि रंगवि जगता निशिदिनीं
पाशच कोमल मोहक पसरी !

■

# सन्त चोखामेळा

[ मोहन–चित्र, १९४० ]

सोयरा...इंदिरा वाडकर      चोखोबा...बाबूराव महिंद्रकर

■

[ ५९ ]

मुली :      ' श्रीहरी माझा त्रिभुवनसुन्दर ! '
' काळा हरि पण गोरी गवळण ! '
' धीट चतुर हरि – '
' दही - दूध चोरी !
काढुनि खोडी घागर फोडी !
अवखळ कान्हा छळी गोपींना '
' मन मोही नटवर गिरिधारी
भान गडे हरी ! '
' गाशिल किति ग तूं तरि हरि - गुण ! '
' प्रभुची माया नटली कणकण ! '

■

[ ६० ]

चोखोबा : आत्मरंगीं प्रेमरंगीं
रंगलेसें अंतरंग

लागे विठ्ठल विठ्ठल छन्द
जीव धुन्द !
नाचे अवघा ब्रम्हानन्द
पांडुरंग ! पांडुरंग ! !

■

[ ६१ ]

सोयरा : संकटीं या धांव सखया !
तारी दयाळा ! दे अभया
साण्डशी माया पण्ढरीराया !
ब्रीद तुझें कां जाय लया ?

चोखोबा : प्रभु ! तारक तूं सकलां
वानुं किती सदया, तुला !
तूंच सखा निर्वाणींचा
दास सदाचा निजभक्तांचा
वाहशी भार शिरीं दयाळा !

■

मराठी ग्रंथ संग्रहालय
६५८८
६६३०

[ ६२ ]

नामदेव : देई देवपण देवाला भक्तिभाव भोळा
जगतिं भक्त भगवन्ताच्या पसरी गौरवाला

थोर किती विठ्ठल-प्रीती
नाम-घोष अस्थी करिती !
आज सन्तराज चोखा देवरूप झाला !

■

[ ६३ ]

सोयरा : जीव-शिव हे भेटले !
जन्म अवघा सफल झाला !
नान्दे समता देवाघरीं
भेदभावा ना थारा !

नाम-नौका सौख्यकारी
तारिते संसार-सागरीं
बन्धुराजा देव आला
जाय सोयरा माहेराला !

■

# अकरावा अवतार

[ मिनर्व्हा-चित्र १९३९ ]

साधु...मारुतिराव                    जीजाबाई...अमीना

■

[ ६४ ]

साधु : देत रविराज शुभ सन्देश !
स्फूर्तिदायक नवा मनु बघ उगवला
तेज उसळत, थोर हित-पथ उजळला
सोड निद्रा राष्ट्रवीरा !
पूजी देश-महेश
देत रविराज शुभ सन्देश !

■

[ ६५ ]

साधु : घेइल शिव अवतार भूवर
दीनदयाघन शंकर प्रभुवर !
धर्माचा ध्वज उंच उभारुन
खलबल दारुण आणिं संहारुन
सांवरील हा विसकटलेला
राष्ट्राचा संसार !
उगवे मंगल नवें क्रान्तियुग
स्वतंत्रता-सुखशान्ति सदा मग
ऐक्य-मंत्र घुमवील चलाचल
जग हें थरथरणार !

■

[ ६६ ]

साधु : मनुजा ! मोह-बन्धन तोड !
जीवित अवघें दो दिवसाचें
जगतीं नाहीं कुणी कुणाचें
तूं माया-ममता सोड !
देशासाठीं होम माण्डिला
धर्मासाठीं जीव साण्डिला
सार्थक तरि मानवजन्माचें !
मोक्षपदाची जोड !

■

[ ६७ ]

जीजाबाई : माउली ! येऊं दे करुणा
विनवि तव चरणा
मुलीची येऊं दे करुणा
मायभूमीची सेवा घडुं दे
जनहिताचा छन्द जडूं दे
कामना सफल करशिल ना ?
संकट -- छाया भिववी हृदया
धांवुनि येई, देई अभया
तुजविणा आळवूं कवणा ?
माउली ! येऊं दे करुणा

■

## राजा श्रियाळ

[उदय-चित्र १९३९]

श्रियाळ...भाऊराव दातार नारद...मधुकर गुप्ते
भैरव...बलवंत परचुरे चांगुणा...गुलाबबाई
चिलया...कुमार दातार शैला...प्रमिला

■

[६८]

श्रियाळ : जय शंकर महादेव !
वन्दन तुज विनत-भाव
शान्तिभास शिव भैरव
क्रान्तिकुशल तव स्वभाव
अतुल बल चलाचलासि
सहज नमवि प्रतिपलासि
दावि नवल कृति अभिनव
भ्रमवि मनुज-मति प्रभाव

■

[६९]

नारद : लीला दावुनि नवल शिवहरा !
भुलविसि या जगतासि नटवरा !
वितरी शान्तिसुख सतत अन्तरा
भजन तुझें सदया शुभंकरा !
मंगल महिमा अतर्क्य सारा
भुलविसि या जगतासि नटवरा !

■

[ ७० ]

चिलया :

दावि दया भगवाना !
छन्द तुझा जडला सतत मना
मी तान्हुलें तुझेंच ना ?
कां मग येइना करुणा ?
तुजविण आळवुं रे कुणा ?
वाहियले प्राण तव चरणा !
दावि दया भगवाना !

■

[ ७१ ]

भैरव :

जय जय शंकर भोळा
अगडबम्ब भं भं भंबोला
जय जय शंकर बोला !
आनन्द लुटा बेबन्द
करूं दे धुन्द शाम्भवीचा गोळा
जय शिव शंकर भोळा !
या रे या ! भर भर प्या !
मजेदार हा घोटा
रुचकर मोठा
भिऊं नको रे तूं कळिकाळा
चार दिसाचा खेळच सगळा
जाईल उडुनी हा पाचोळा
नाशवन्त संसार-उमाळा
जय शिव शंकर भोळा !

■

[ ७२ ]

चांगुणा : चिलया मोतीदाणा
भरला त्याचा घाणा
ठाकला साक्षी राणा
कैलासाचा !

धैर्याचें हें उखळ
सत्वाचें हें मुसळ
चांगुणा ही प्रेमळ
काण्डीतसे !

माझा चिमणा राजा
गोण्डस हा कलिजा
करी देवांच्या काजा
आत्मार्पण !

जिंकोनी कळिकाळ
वेल्हाळ लडिवाळ
झाला चिलया बाळ
चिरंजीव !

■

राजा श्रियाळ

# पैसा बोलतो आहे

[ नवहंस-चित्र १९४३ ]

बन्सी...चोणकर विद्या...सौ. नलिनी डेरे

मीना...कुसुम देशपांडे

■

[ ७३ ]

भिकारी : रंगरसेली नटली दुनिया
कां भुललास गड्या, वांया ?
नश्वर हा संसार-पसारा
दोन घडींची माया !
कोठुनि आलों, कुठें चाललों,
नाहीं ठाव-ठिकाणा !
मुशाफरी संपणार केव्हां ?
दुबळा जीव दिवाणा !
पैसा पैसा जोडुनि अवघा
प्रपंच गोळा केला
प्राणी परि एकटा शेवटीं
आला तसाच गेला !

■

बन्सी : बुडलें जग हलकल्लोळीं !
राख घरादारांची सगळी
कलिजाचीही होळी !

बॉम्ब, बन्दुका, तोफा दणणण
करिति जगाची रांगोळी
घुसली माझ्या काळजांत पण
मदनमंजरी गोळी !

जगास मारी उपासमारी
पण मज साखरपोळी !
दुनिया रडते, परन्तु हंसते
माझी आशा भोळी !

■

[ ७७ ]

मीना : पुरे यादवी आतां देशबन्धुंनो !
सारे मिळुनी चला
जाऊं अघाडीला
लढुनी विजय वरूं या !
संकटिं तारा आपुला भारत प्यारा !

स्वातंत्र्यवीराचें व्रत आचरूं या
खडतर दैन्य हरूं या
संकटिं तारा आपुला भारत प्यारा !

ऐका हो क्रान्तीचा डंका-इशारा
धैर्याचा, शौर्याचा झेण्डा उभारा
संकटिं तारा आपुला भारत प्यारा !

■

[ ७८ ]

विद्या : गडे, सांग ना फुलराणी !
नवलाची प्रेमकहाणी
प्यारी प्यारी न्यारी न्यारी !

माझ्या ग हृदयेशाचे
गडे, बोल बोल जिवाचे
प्रीतीच्या सन्देशाचे

तूं चतुरच गोजिरवाणी
प्यारी प्यारी न्यारी न्यारी !

नाचत मनमोर पुकारे पियू पियूऽऽ
कोयळही मनिंची बोले कुहू कुहू ऽऽ
दुनियेचा बगिचा फुलला
नव वसन्त अन्तरिं खुलला

चल गाऊं मंजुळ गाणीं
प्यारी प्यारी न्यारी न्यारी !

■

[ ७९ ]

विद्या : मी फुलविन जादु नवी ही
मधुमाधुरी सुखदायी !

कुणि शिकवी नकळत मजला
नवल कला—चतुराई

किति गोड गुपित मनिं दडलें
कशि कुणासि सांगू बाई ?
फुलविन जादु नवी ही !

कधीं सहज हसविन हसुनी
कधीं रुसविन लटके रुसुनी

माझा राया साधा भोळा
मग प्रेमें कवळिन हृदयीं

मी फुलविन जादु नवी ही !

■

# ध्रुव

[ प्रभा – चित्र – १९३८ ]

ध्रुव... बालकराम

■

[ ८० ]

ध्रुव : धांव पाव आतां देवा ! धांव घे दयाळा ?
किती पाहशी रे अन्त ?
म्हणविशी करुणावन्त !

उडी घाल जाणुनि माझा भक्तीचा जिव्हाळा
धांव पाव आतां देवा ! धांव रे दयाळा !

प्राण होति नयनीं गोळा
कुठें तुला पाहूं डोळां ?

पुरवि तुझ्या दर्शनाची आस विश्वपाळा !
धांव पाव आतां देवा ! धांव घे दयाळा !

आळवोनि शिणला कण्ठ
मागतों न मी वैकुण्ठ

केवि पडे दर्शन द्याया सांकडें कृपाळा !
धांव पाव आतां देवा ! धांव रे दयाळा !

■

# रामशास्त्री

[ प्रभात–चित्र १९४४ ]

जानकी...मीनाक्षी  शामा...हंसा वाडकर
राणोजी...मा. विठ्ठल  गोपाळ...मा. कुळकर्णी

■

[ ८१ ]

जानकी : शुभ शकुन सांगा कुणी बाई !
विनवी कौसल्या ही
सुकुमार माझा राम वनीं जाई
येईल का परतून लवलाही ?
शुभ शकुन सांगा कुणी बाई !
जाय दूर गोजिरें लेकरूं
कुणी भेटवा गाय-वांसरूं
घ्या हो पदरीं पुण्याई !
पाहुं कुठें माझा घननीळ ?
प्राण उभे नेत्रांत उताविळ,
आशा घोटाळत राही !
आतां एकदां तरि अखेरची
ऐकूं येइल का रामाची
गोड हांक — 'आई ! आई !'

■

[ ८२ ]

शामा : हांसून बोल ना, रुसूं नको ना
जाऊं नको टाकून मला रे मनमोहना !
कशी दया माया तुला रे सख्या येईना ?

राणोजी : कां घेशी करुनी जीवाची दैना ?

शामा : मनांत दिनरात झुरते ही मैना !

राणोजी : चतुर छबेला हा पञ्छी प्यारा
दावील रंगेल रंग ढंग न्यारा
सोन्याचा पिंजरा, मोत्यांचा चारा

शामा : सोन्याचा पिंजरा, मोत्यांचा चारा

राणोजी : सजणि ग मायेचा तुला उबारा ;
खुषीनं घे माझ्या कुशींत निवारा !

शामा : खट्याळ अवखळ माधुक मैना
भुरंकन् उडेल, कोण्डून राहिना !
नजरेच्या तालावर नाचव डोलव
मिठे मिठे प्रीतिबोल गुलगुल बोलव

राणोजी : माझ्या जिवाच्या पिंजऱ्यामधीं ग
झुलत झुलत राहशिल ना ?

शामा : तुझ्याच संगं मलाबी सजना !
इष्काच्या नगराला घेऊन चल ना !

■

[ ८३ ]

गोपाळ : मी काशीला ग जाणार ?
जम्मत पहा तरी !
मी शास्त्रीबुवा होणार !
गम्मत पहा तरी !

शामा : अग बया ! खरोखरी ?

गोपाळ : मी शास्त्रवेद शिकणार !

शामा : खरोखरी ?

गोपाळ : [ रामो हरिः करी भूश्त ... ]

शामा : भुर्र भुर्र रामा हरी ...
अहा पाहा ह्यो मुखडा
चन्द्राचा जनुं तुकडा
बाई कुनी द्रिष्ट तरी काढा !

राणोजी : आस्ते कदम ! आस्ते कदम महाराज !
पोशाख उंची दरबारी
पगडी अंगरखा भर्जरी

शामा : शास्त्रीबुवाला शोभंल भारी
कवतुक व्हईल घरोघरीं !

गोपाळ : मी शास्त्रीबुवा होणार
जम्मत पहा तरी !
मग कुणिहि नाहिं करणार
माझी बरोबरी !

राणोजी : ते सरदार मानकरी हुजरे
किति करतिल दरबारीं मुजरे

शामा : कशी भालदार चोपदारबी
पुकारतिल ललकारी !

राणोजी : [ ताजीम खडी ताजीम
निगा रख्खो महाराज ! ]

शामा : झळकंल ग कानीं हिऱ्याची
भिकबाळी लई मोलाची
ग लई मानाची !

गोपाळ : जगिं पसरणार माझा
लौकिक परोपरी !

शामा व राणोजी—मग मिरवाल पालखीतनं
ऐटींत खरोखरी !

■

[ ८४ ]

जानकी : देखवेना डोळां हा घोर आकान्त
बघूं नको अन्त भगवन्ता !

कां रे जगजेठी ! लोटिशी संकटीं
श्रद्धेची कसोटी पाहावया ?

धन मान सत्ता देऊनि आम्हांसी
व्यर्थ मोहपाशीं गुन्तवीशी !

सत्य, न्याय, नीति, नित्य धर्म-प्रीति
शक्ति आमुची ती अभंगची !

भक्तिभाव थोर आमुचा अढळ
तुझें तूं साम्भाळ ब्रीद आतां !

तुझें चरणाचें तीर्थ गंगाजळ
देई आत्मबळ चित्त-शान्ति !

REFBK-0006782
REFBK-0006782

[ ८५ ]

६८८२ ६६३२

राणोजी व लोक :

अवतारच तूं नरवरा !
ब्रह्मभास्करा !
सत्यधर्मांचा
घे त्रिवार मुजरा तुला महाराष्ट्राचा !
तव सत्वशील-चारित्र्य,
त्याग, पावित्र्य,
जगाला भारी
तूं पुण्यवन्त, आदर्श सन्त संसारी !
नभिं चन्द्र सूर्य झळकती,
कीर्ति तंवर ती
वाढत्या तेजें
गातील उद्यांचीं युगें पवाडे तूझे !
धोक्यांत प्राण तरी ढळे न ब्रीद-इमान
नच जुलमी सत्तेपुढें वांकते मान
तुजसमान पुरुषच देशाचा अभिमान
तुजमुळें जगीं वाढला
गौरवच भला
भरतखण्डाचा
घे त्रिवार मुजरा अखेरचा हा अमुचा !

■

रामशास्त्री

# सदाशिव अनन्त शुक्ल

ह्यांचीं

# प्रकाशनमार्गावरील पुस्तकें

■

नवी राजवट

[ ' मून इज् डाउन 'चा अनुवाद ]

मधु बोल

सु हा सि नी

मो हो ळ

असत्याचे प्रयोग

नवीं नक्षत्रें

मायेची शाल

शापित सिंहासन

रा म जो शी

गोकुळचीं गाणीं

रंग-तरंग

नव्या जगांत

त्रि वे णी

■